महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : सहावी

---------------------------------------------------------------------------------------------------

# लेखन : स्व-अभिव्यक्ती

**अनुभव लेखन**

१) लोक जेव्हा तुला म्हणतात, की तू नको मध्ये मध्ये करू नको. तेव्हा तुझ्या मनात कोणकोणते विचार येतात?

२) खालील मुद्दे नीट वाच. त्याआधारे तू स्वत: विषयी लिहून इतरांना तुझ्याविषयी जास्तीची माहिती दे.

a] तुला काय करताना जास्त आनंद होतो?

b] तुला सर्वात जास्त राग कशाचा येतो?

c] तुला कोणत्या कामाचा किंवा गोष्टींचा तिटकारा वाटतो?

d] तुला काय व्हायचंय?

e] तुझ्या मते तुझा स्वभाव कसा आहे?

३) तुम्ही मित्र-मैत्रिणी मिळून सहलीला गेलेले आहात असं समजा. त्यावेळी तुमचा एखादा मित्र हरवला तर तुम्ही काय कराल? ते सविस्तर लिही.

४) खरं बोलण्याच्या फायदे आणि तोट्यांची यादी कर. किमान पाच-पाच मुद्दे लिही.

५) तुम्ही मित्र/मैत्रिणी सुट्टीच्या दिवशी फिरायला जाणार आहात. तुझ्याकडे नियोजन दिलं आहे. तू काय काय करशील याची यादी कर. यात वेळ,कसं जायचं ,जेवण,गटातलं काम,जबाबदाऱ्या याची नोंद कर.

६) आवडत्या शिक्षकांची बदली झाल्यावर तुला काय वाटले ते लिही.

७) बाजाराचे वर्णन तुझ्या शब्दांत कर.

८) तुला कशाकशाची भीती वाटते? कशामुळे? ते तुझ्या भाषेत लिही.

**अहवाललेखन .**

शाळेत झालेल्या वाचन-प्रेरणा-दिनाचा अहवाल लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**कविता**

१) "माझी नदी गेली कुठे ,
तिच्याविना जीव तुटे ,
तिचं जीवन हिरावून घेतलं ,
तिच्यावर नव्हे, आपल्यावर बेतलं."

या ओळीचा अर्थ तुझ्या मते काय आहे ते सविस्तर लिही.

२) कोकणातली आजी
घाटावर आली
कृष्णेच्या पुरात
वाहून गेली.
व्हावता व्हावता
म्हातारी हसली
मळ्यातली वांगी
डोळ्यांना दिसली
म्हातारी लागली
हलवायला पाय
म्हणाली,
"ही खाल्ल्याशिवाय
मरेन की काय!"

ही कविता वाचताना तुला काय काय मजा वाटली ते लिही.

---

**काल्पनिक लेखन**

१) तुझं स्वप्न काय आहे? त्याविषयी एक परिच्छेद लिही व ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी तू काय काय करणार आहेस ते ही लिही.
२) तुला मोठं झाल्यावर कोण व्हावंसं वाटतं ? का?
३) तू कोणाला तरी मारलेस. नंतर तुला समजले की त्याची चूक नव्हती तर तू काय करशील?
४) जिन्याच्या पायऱ्या आपल्याला काय सांगतील? कल्पना करून लिही.

**जाहिरात**

तुझ्या गटाने बनवलेल्या चिवड्याची जाहिरात बनव.

**पत्रलेखन**

१) तुझ्या बाईंना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे त्यांचं अभिनंदन करणारं पत्र लिही.
२) मोबाइल कम्पनीला पत्र लिहून जहिरातींचे संदेशन पाठ्विण्यबाबत कळव.
३) वर्गाच्या सहलीला जाण्यासाठी बसची चौकशी करणारे पत्र लिही. ठिकाण, मुलांची संख़्या इत्यादि माहिती देऊन ख़र्च किती येईल याची महिती काढ.

**बातमी**

१) तुझ्या शाळेत साजऱ्या झालेल्या स्वातंत्र्य दिनाची बातमी तयार कर.
२) तू पाहिलेल्या प्रदर्शनाची बातमी तयार कर.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**भाषण**

चौकातील घाण स्वच्छ करायची आहे. तू मित्रांना थोडक्यात कसे पटवून देशील. तुझं भाषण तयार कर.

**संवाद लेखन**

१) तुझे मामा आजारी आहेत तेव्हा तू त्यांची फोनवर बोलून चौकशी करत आहेस अशी कल्पना करून तो संवाद तुझ्या भाषेत लिहून काढ

२) तू अचानक आजारी पडली/पडला आहेस अशी कल्पना कर. तू काही दिवस शाळेत येऊ शकत नाहीस तेव्हा शिक्षकांना फोनवर बोलून परवानगी घेताना जो संवाद घडेल तो लिही.

३) बसा स्टँडवर बसलेली दोन माणसे एकमेकांत काय बोलतील ते लिही.

४) शाळेला अचानक सुटी मिळाली तर मित्र-मैत्रीणी एकमेकांत काय बोलतील ते लिही.

५) कागद आणि पेन या दोन वस्तू एकमेकांशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिही.

६) कडी आणि कुलूप या दोन वस्तू एकमेकांशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिही.